# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION
# JAGADGURU SANT TUKARAM MAHARAJ SANTPITH SCHOOL & JR. COLLEGE

Patilnagar, Talgaon Chikhali, Pune - 411062

Affiliation No: 1120131 School Code: 32147 UDISE CODE: 27252000538

Contact No: 9022816058 E-mail : santpithschool@gmail.com


जा.क्र.संतपीठ/स्कूल/०१/कावि/337 /२०२५-२६ दिनांक - 06/११/२०२५

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांची वार्षिक प्रगतीची नोंद करणेकामी गुणपत्रक खरेदीबाबत...

प्रति,
मा.---------------------
------------------------
------------------------

## कोटेशन नोटीस क्र. १३/२०२५ – २०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांची वार्षिक प्रगतीची नोंद करणेकामी विद्यार्थ्यांसाठी गुणपत्रक खरेदी करणे आवश्यक आहे. तरी सदर साहित्य खरेदीकामी सिलबंद दरपत्रके मागविणे आवश्यक असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे....

| अ. क्र | साहित्याचा तपशील | स्पेसिफिकेशन | नग संख्या | सर्व करांसह प्रति नग दर |
|---|---|---|---|---|
| १. | गुणपत्रक (पूर्व प्राथमिक) | **गुणपत्रक फाईल फोल्डर :**<br>साईज : ९.५ X १२ इंच,<br>पेपर जी.एस.एम. : ३००<br>प्रिंटींग : मल्टीकलर, ग्लॉस लॅमिनेशन आणि प्लास्टिक क्लीप<br>**गुणपत्रक आतील बाजू :**<br>पेपर साईज : A4<br>पेपर नग : ०६, पेपर जी.एस.एम. : ७५<br>प्रिंटींग : एक बाजूस ब्लॅक अॅन्ड व्हाईट | १ | |
| २. | गुणपत्रक (प्राथमिक) | **गुणपत्रक फाईल फोल्डर :**<br>साईज : ९.५ X १२ इंच,<br>पेपर जी.एस.एम. : ३००<br>प्रिंटींग : मल्टीकलर, ग्लॉस लॅमिनेशन आणि प्लास्टिक क्लीप<br>**गुणपत्रक आतील बाजू :**<br>साईज : A4<br>पेपर नग : ०२, पेपर जी.एस.एम. : ७५<br>प्रिंटींग : एक बाजूस कलर | १ | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधाराकांनी उपरोक्त नमूद केलेल्या साहित्याचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मा. प्राचार्य, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली यांचे नावे दिनांक - 06/११/२०२५ ते दि - 13/११/२०२५ अखेर दुपारी ३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.

२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप अॅक्ट नोंदणी दाखला, पॅनकार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र, आयकर भरत असलेबाबतचा मागील २ वर्षाचा पुरावा इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

३. पुरवठा धारकाने आपले दर सर्व करासह व वाहतूक खर्चासह पोहोच देण्यात यावे.

४. कोटेशन नोटीसमधील नमूद स्पेसिफिकेशनुसार गुणपत्रकाचा पुरवठा स्वखर्चाने जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज हे पाटीलनगर, टाळगाव चिखली येथे करावा लागेल.

५. पुरवठा आदेशानुसार दिलेल्या मुदतीत सदर साहित्याचा पुरवठा न केलेस प्रतिदिनी रक्कम रुपये ५००/- विलंब शुल्क आकारणेत येवून त्याची देय बीलातून वसुली करणेत येईल.

६. मंजूर केलेले दर सदर साहित्याचा पुरवठा पूर्ण होईपर्यंत पुरवठाधरकावर बंधनकारक राहतील.

७. पुरवठा धारकास कोणत्याही प्रकारची भाववाढ / नुकसान भरपाई मिळणार नाही.

८. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

९. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

१०. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

११. सदरचे काम हे मा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राचार्य यांच्या सूचनेनुसार करावयाचे आहे. त्यांच्या पोहोच चलनानुसार बील अदा करणेत येईल.

१२. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१३. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

**संदीप खोत**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ